# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार

## कनिष्ठ प्रशासन अधिकारी या पदोन्नती संवर्गासाठी दि.०२/०८/२०२४ रोजी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येऊन दि.०८/०८/२०२४ पर्यंत मागविण्यात आलेल्या आक्षेप व हरकतींच्या निराकरणाबाबत

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम व कार्यरत ठिकाण | आक्षेप / हरकतीचे संक्षिप्त विवरण | हरकती निराकरणाबाबत केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ८ | श्री.गणेश आनंदा कोळी, वरिष्ठ सहाय्यक, बांधकाम विभाग जि.प.नंदुरबार | दि.२१/०६/२०२४ रोजीच्या ज्ञापनान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या वरिष्ठ सहाय्यक संवर्गाच्या अंतिम जेष्ठता सूचीमध्ये माझे नाव अ.क्र.३८ वर नमुद करणेत आलेले असून श्री.हरिष मुरलीधर अहिरे यांचे नाव अ.क्र.४१ वर नमूद करणेत आलेले आहे. परंतु कनिष्ठ प्रशासन अधिकारी संवर्गात पदोन्नती देणे कामी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या प्रसिध्द यादीत माझे नाव अ.क्र.१९ वर दर्शविणेत आलेले असून श्री.हरिष मुरलीधर अहिरे यांचे नाव माझ्या नावा अगोदर अ.क्र.१७ वर नमूद करणेत आलेले आहे. यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या वरिष्ठ सहाय्यक संवर्गाच्या जेष्ठता सूचीत माझा नोंदविलेला आक्षेप ग्राह्य धरण्यात येवून अंतिम जेष्ठता सुचीमध्ये आवश्यक बदल करुन दुरुस्ती यापूर्वीच करणेत आलेली आहे. असे असतांना देखील कनिष्ठ प्रशासन अधिकारी संवर्गात पदोन्नती देणेसाठी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या यादीत श्री.अहिरे यांना अ.क्र.१७ वर माझ्यापेक्षा ज्येष्ट दर्शविण्यात आलेले आहे. मी दि.२४/०१/२०१२ रोजी जि.प.सेवेत सरळसेवेने हजर झालेलो असून श्री.हरिष अहिरे हे माझ्याआधी सेवेत हजर झालेले असले तरी देखील ते सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उशीराने म्हणजेच माहे डिसेंबर २०१२ मध्ये उत्तीर्ण झालेले आहेत. तसेच ते मुदतीत सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण झालेले नसल्याने शासन नियमानुसार त्यांची सेवा जेष्ठता अबाधित राहत नाही. व मी दि.२४/०१/२०१२ रोजी शासकीय सेवेत रुजू झालेलो असून सेवा प्रवेशोत्तर परीक्षा देखील मुदतीत उत्तीर्ण झालेलो आहे. त्यामुळे शासन नियमांच्या आधारे मी श्री.हरिष मुरलीधर अहिरे यांना सेवा जेष्ठ म्हणून संबोधण्यास पात्र आहे. करिता कनिष्ठ प्रशासन अधिकारी पदाच्या पदोन्नती बाबतच्या विचारक्षेत्रातील यादीत आवश्यक दुरुती करण्यात यावी. | ग्रामविकास व जलसंधारण विभाग अधिसूचना दिनांक २४ मे १९९९ मधील नियम ३ (३) अन्वये श्री.गणेश आनंदा कोळी हे सेवा प्रवेशोत्तर परिक्षा विहीत संधीत व मुदतीत उत्तीर्ण असल्यामुळे श्री.हरिष मुरलीधर अहिरे यांना जेष्ठ आहेत. त्यानुसार कनिष्ठ प्रशासन अधिकारी संवर्गात पदोन्नती देणे कामी विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या यादीत नोंद घेण्यात आली असून आपणास उचित जेष्ठता क्रम देण्यात आला आहे. |

Signed by Pandurang Sakharam Kolhe
Date: 24-08-2024 16:44:36

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद नंदुरबार